# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**३४) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि२८.०६.२०२२**

जिल्हा : अहमदनगर

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०६/२०२२ ते २७/०६/२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२९/०६/२०२२ ते ०३/०७/२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ |
| ५.० | ४१.८ | ४२.६ | १.६ | १९.६ | ५.८ | ५.० | पाऊस (मिमी) | १८ | २४ | २२ | १५ | १० |
| ३३.८ | ३२.२ | ३३.२ | ३०.२ | २८.६ | ३२.४ | ३३.८ | कमाल तापमान (अंसे.) | ३२ | ३० | ३० | ३१ | ३३ |
| २५.१ | २३.७ | २२.५ | २३.९ | २४.७ | २३.९ | २५.१ | किमान तापमान (अंसे.) | २३ | २२ | २१ | २२ | २३ |
| २.० | २.० | २.० | २.० | २.० | २.० | २.० | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ७७.० | ८७.० | ९५.० | ९०.० | ८४.० | ८४.० | ७७.० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ७८ | ७९ | ८० | ८१ |
| ५२.० | ४९.० | ६१.० | ७६.० | ५१.० | ६०.० | ५२.० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६३ | ६२ | ६६ | ६७ |
| ५.६ | ३.९ | २.६ | ०.६ | १.५ | १.८ | ५.६ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २३ | २४ | २३ | २५ | २४ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे तसेच पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | मागील आठवड्यात जिल्ह्यात बर्याच ठिकाणी पाऊस झालेला आहे. त्यामुळे जमिनीतील ओल लक्षात घेऊन वाफसा आल्यास पेरणी करावी. |
| पशुधन व्यवस्थापन | | सध्याच्या ढगाळ व दमट वातावरणात बाह्य परोपजीवी उदा. माशा , पिसवा, डास यांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी पशुवैद्यकांच्या सल्ल्याने बुटॉक्स , इक्टोमिन या औषधांची जनावरांच्या अंगावर तसेच गोठ्यात फवारणी करावी. गोठ्यामध्ये संध्याकाळच्या वेळी कडूनिंब , सिताफळ यांसारख्या पाल्याची धुरी करावी. काही भागात मान्सूनपूर्व पावसामुळे गवताची उगवन झाली आहे. असे कोवळे गवत जनावरे जास्त प्रमाणात खाणार नाहीत याची काळजी घ्यावी. शेळया मेंढयांमध्ये रोग प्रतिबंधक लसीकरण केले नसल्यास तातडीने लसीकरण करून घ्यावे. पावसाचा अंदाज घेऊन जनावरांसाठी योग्य निवारा करावा. विशेषत: शेळया मेंढ्यांबाबत त्या पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. शेळया मेंढ्या माजावर येत असल्याने त्यांच्या खाद्यात वाढ करावी. गोठा कोरडा राहावा यासाठी गोठ्यात चुना भुरभुरावा. |
| तूर | पेरणीची तयारी | **पेरणीची वेळ:** १० जुलै पूर्वी<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाणास ५ ग्रॅम ट्रायकोडर्माचा बीजप्रक्रिया करावी. यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणातून चोळावे.<br>**खतमात्रा:** तुरीसाठी हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद म्हणजेच १२५ किलो डीएपी पेरणीचे वेळी द्यावे. |
| भुईमुग | पेरणीची तयारी | **बियाण्याचे प्रमाण:** १२० ते १२५ किलो प्रती हेक्टरी<br>**पेरणीची वेळ:** १५ जुलै पर्यत<br>**बीजप्रक्रिया:** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्व प्रति किलो बीयाण्यास ५ ग्रॅम थायरम किंवा २ ग्रॅम कार्बेन्डाझिम किंवा ३ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबियम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक चोळावे बीजप्रक्रिया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे.<br>**खतमात्रा:** पेरणीच्या वेळेस २५ किलो नत्र + ५० किलो स्फुरद द्यावे. खत व्यवस्थापन (सुधारित शिफारीनुसार २०१३) भुईमुगाच्या अधिक उत्पादनासाठी रासायनिक खत मात्रे सोबत जिप्सम ४०० कि/हे (२०० कि/हे पेरणीवेळी तर उर्वरित २०० कि/हे आऱ्यासुटतांना) जमिनीत मिसळून द्यावे. |
| मका | पेरणीची तयारी | **बियाण्याचे प्रमाण:** १५ ते २० किलो प्रती हेक्टरी<br>**पेरणीची वेळ:** १५ जुलै पर्यत |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | **बीजप्रक्रिया:** २ ते २.५ ग्रॅम थायरम/ किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे. तसेच पेरणीपूर्वी अॅझोटोबॅक्टर वापरावे.<br>**खतमात्रा:** पेरणीच्यावेळी ४० किलो नत्र , ६० किलो स्फुरद , ४० किलो पालाश प्रति हेक्टर , पेरणीनंतर ३० दिवसांनी ४० किलो नत्र , पेरणीनंतर ४०-४५ दिवसांनी ४० किलो नत्र प्रतिहेक्टर. सूक्ष्म अन्नद्रव्य : जमिनीत झिंकची कमतरता असल्यास हेक्टरी २० ते २५ किलो झिंक सल्फेट द्यावे. |
| **बाजरी** | **पेरणीची तयारी** | **बियाण्याचे प्रमाण:** ३ ते ४ किलो प्रती हेक्टरी<br>**पेरणीची वेळ:** १५ जुलै पर्यत<br>**बीज प्रक्रिया:** अ) २० टक्के मिठाच्या द्रावणाची बीजप्रक्रिया: बीजप्रक्रिया केलेले प्रमाणित बियाणे उपलब्ध नसल्यास पेरणीपूर्वी बियाण्यास २० टक्के मिठाच्या द्रावणाची प्रक्रिया करावी. त्यासाठी १० लिटर पाण्यात २ किलो मीठ विरघळावे. पाण्यावर तरंगणारे बुरशी युक्त हलके बियाणे बाजूला काढून त्यांचा नाश करावा व तळाला असलेले निरोगी आणि वजनाने जड असलेले बियाणे वेगळे करून पाण्याने २ ते ३ वेळा धुवावे त्यानंतर सावलीत वाळवून पेरणीसाठी वापरावे.<br>ब) मेटॅलॅक्झील ३५ डब्लु.एस. बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी बियाण्यास ६ ग्रॅम मेटॅलॅक्झील ३५ डब्लु.एस. प्रति किलो बियाण्यास चोळून नंतर पेरणी करावी.<br>क) अझोस्पिरीलम व स्फुरद विरघळविणारे जीवाणू संवर्धनाचा बीजप्रक्रिया: २५ ग्रॅम अझोस्पिरीलम प्रती किलो बियाण्यास चोळून पेरणी करावी. त्यामुळे २० ते २५ टक्के नत्र खताची बचत होऊन उत्पादनात १० टक्के वाढ होते. तसेच स्फुरद विरघळविणारे जिवाणूची २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.<br>**खतमात्रा:** ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश हलक्या जमिनीत तर मध्यम जमिनीत ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश प्रति हेक्टरी. पेरणीच्या वेळी अर्धा नत्र व संपूर्ण स्फुरद व पालाश आणि २५ ते ३० दिवसांनी उर्वरित अर्धा नत्र (जमिनीत ओलावा असतांना) द्यावा. रासायनिक खते दोन चाडीच्या पाभरीने पेरून द्यावीत. |
| **सूर्यफूल** | **पेरणीची तयारी** | **बियाण्याचे प्रमाण:** ८ ते १० किलो प्रती हेक्टरी<br>**पेरणीची वेळ:** जुलैचा पहिला पंधरवाडा<br>**बीजप्रक्रिया:** केवडा रोग टाळण्यासाठी ६ ग्रॅम मेटॅलॅक्झील ३५ डब्लु.एस. प्रति किलो बियाण्यास चोळावे. तसेच विषाणूजन्य (नॅक्रॉसिस) रोगाच्या प्रतिबंधासाठी इमिडॅक्लोप्रिड ७० डब्ल्यू. ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास लावावे. त्यानंतर अॅझोटोबॅक्टर हे जीवाणू खत २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे.<br>**खतमात्रा:** कोरडवाहू पिकास प्रति हेक्टरी २.५ टन शेणखत तसेच ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश पेरणीच्या वेळेस दोन चाड्याच्या पाभरीने पेरून द्यावे. बागायती पिकास प्रति हेक्टरी ६० किलो नत्र + ६० किलो स्फुरद + ६० किलो पालाश द्यावे. यापैकी ३० किलो नत्र व संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उरलेल्या ३० किलो नत्राची मात्रा पेरणीनंतर एक महिन्याच्या आत द्यावी. गंधकाची कमतरता असलेल्या जमिनीसाठी प्रति हेक्टरी २० किलो गंधक पेरणीच्या वेळी गांडूळ खातात मिसळून द्यावे. |

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.

दि. : २८.०६.२०२२

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**